



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ४ था ❑ शुक्रवार दि.३० जानेवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## विमान अपघात: तांत्रिक बिघाड, घातपात की खराब हवामान?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

महाराष्ट्रातील बारामतीत बुधवारी सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान लँडिंग दरम्यान क्रॅश झाले. या भीषण अपघातात अजित पवारांसह विमानातील सर्व प्रवासी ठार झाले. नागरी विमान वाहतूक महानिदेशालयाने () अजित पवारांसह सर्वांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. अजित पवार जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सभेसाठी बारामतीला निघाले होते. या विमान अपघाताची खरी कारणे तपासणीनंतरच समोर येणार आहेत. अजीद दादा यांच्या विमान दुर्घटनेचे राजकारण सुरू झाले असून...

अजित पवारांच्या विमान अपघातानंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी संशय व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीत चौकशीची मागणी केली आहे. अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिल्ली दौरा रद्द केला. ममता म्हणाल्या, कोणीही सुरक्षित नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली योग्य चौकशी झाली पाहिजे. हे विनाकारण भीती पसरवणारे आहे की कट आहे, हे काळच सांगेल. तथापि, सर्वात सोपा मार्ग म्हणजे पायलटला दोष देणे, जसे आपण मागील दोन प्रकरणांमध्ये पाहिले आहे.

मात्र, प्राथमिक अहवालांनुसार तांत्रिक बिघाडाची शक्यता वर्तवली जात आहे. युरोपियन ट्रान्सपोर्ट सेफ्टी काउन्सिलच्या एका अहवालानुसार, जगभरातील ९० टक्के विमान अपघातांची मुख्य कारणे तांत्रिक बिघाड असतात. तसेच खराब हवामानही विमान क्रॅशसाठी जबाबदार ठरू शकते. बहुतांश विमान अपघात तांत्रिक बिघडण्याने होतात. विमानात तांत्रिक बिघाड का होतो, याची शहानिशा आधीच करायला पाहिजे. विमान सुस्थितीत आहे की नाही, हवामानाचा अंदाज, लँडिंगपूर्व स्थिती या बाबी आधीच जाणून व समजून घेण्याची गरज आहे.

एविएशन सेफ्टीच्या माहितीनुसार, सर्वाधिक विमान अपघात टेकऑफ दरम्यान आणि त्यानंतर लँडिंगदरम्यान होतात. २०२३ मध्ये १०९ अशा दुर्घटना घडल्या, त्यापैकी ३७ टेकऑफ आणि ३० लँडिंगदरम्यान झाल्या. गेल्या वर्षी एअर इंडियाच्या विमानाचा अपघातही टेकऑफ दरम्यानच झाला होता. एका अहवालानुसार, गेल्या ७ वर्षांत दरवर्षी सरासरी २०० विमान अपघात झाले आहेत. टेकऑफ किंवा लँडिंग दरम्यानच बहुतेक वेळा इंजन फेल होतात, जे तांत्रिक दोषामुळे घडते. अशा घटनांपासून आपण बोध कधी घेणार?

खराब हवामानामुळे देखील अपघात होतात. हवामानाचा पूर्व आढावा, व अंदाज घ्यायला पाहिजे. ढगाळ व पावसाचा अंदाज असेल तर लँडिंग करायला नको. आधीच अंदाज घेतला तर दुर्घटना टाळता येऊ शकते.

पायलट कधीकधी खराब हवामानात अडकतात किंवा अचूक अंदाज घेऊ शकत नाहीत, तर विमान क्रॅश होऊ शकते. ढगांमध्ये विमान उडवताना पायलट गोंधळून जातात. जर पायलट चांगल्या कॉकपिट रिसोर्स मॅनेजमेंट कौशल्यांचे पालन करत नसतील, तर अपघात होऊ शकतात. हवामानाच्या स्थितीनुसार, विमान व्हिज्युअल फ्लाइट रूल्स () किंवा इन्स्ट्रुमेंट फ्लाइट रूल्स () नुसार चालवले जाते. अंतर्गत पायलट मुख्यतः कॉकपिटबाहेरील दृश्य आणि संकेतांचा वापर करतात. अंतर्गत विशेष ज्ञान आणि कौशल्याची गरज असते.

विमान कोणाच्या मालकीचे आहे? खाजगी की सरकारी याबाबत देखील योग्य ती खबरदारी घेण्याची गरज आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार ज्या विमानातून प्रवास करत होते ते विमान (व्हीएसआर) या खाजगी कंपनीच्या मालकीचे होते. लिअरजेट ४५ ( ४५) हे या विमानाचे मॉडेल होते. ही विमाने प्रामुख्याने खाजगी प्रवासासाठी वापरली जातात. ते विमान अत्याधुनिक जेट स्वरुपातील होते. – असा या विमानाचा नोंदणी क्रमांक होता. या विमानाचे कॅप्टन रोहित सिंग होते. या विमान कंपनीचे मालक व्ही. के. सिंग हे आहेत. या विमानात उपमुख्यमंत्र्यांसह एकूण पाच जण स्वार होते.

कोणत्या कारणामुळे अपघात झाला, हे सध्या तरी सांगणे कठीण असले तरी तांत्रिक बिघाड, लाफरवाही, बेजबाबदरपणा किंवा खराब हवामान, की घातपात या पैकी कुठले तरी एक कारण असू शकते. मात्र जी घटना झाली. ती अतिशय दुर्दैवी असून कधी पोकळी भरून न निघणारी आहे. दादांचे विमान विमान जोरात खाली आले, आदळताच स्पोट झाला. जळून खाक झाले. या अपघाताची चौकशी होणार आहे.

सुरक्षित हवाई प्रवासासाठी विमानतळांवर मेटल डिटेक्टर, प्रगत इमेजिंग तंत्रज्ञान आणि सामान तपासणीसह सहकार्य करण्याची गरज आहे. केबिन बॅगमध्ये १०० मिली पेक्षा जास्त द्रव पदार्थ बाळगू नये. धोकादायक आणि प्रतिबंधित वस्तू (जसे की ज्वलनशील पदार्थ) बाळगणे टाळावे. केवळ टेकऑफ आणि लँडिंग दरम्यानच नव्हे तर संपूर्ण उड्डाणादरम्यान (विशेषतः जेव्हा सीट बेल्टचे चिन्ह चालू असेल तेव्हा) तुमचे सीट बेल्ट घातले पाहिजे. एअरलाइन क्रूच्या सूचनांचे पालन करायला पाहिजे. विमानांमध्ये सुमारे ३७% प्राणघातक अपघात लँडिंग दरम्यान होतात, म्हणून या काळात सर्वोच्च पातळीची दक्षता आवश्यक आहे.

# प्रत्यक्ष वाद्यातून निर्माण झालेले संगीत हृदयाचा ठाव घेते–पद्मविभूषण डॉ. इलायाराजा

**भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल पद्मविभूषण इलायाराजा पद्मपाणी पुरस्काराने सन्मानित**

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : संगीतामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. यंत्रावर बोटे फिरवून संगीत दिले जाते. त्यात तांत्रिकता येते. ते संगीत कानापर्यंत पोहोचते. मात्र, सगळ्या वादकांनी प्रत्यक्ष वाद्य वाजवून निर्माण केलेले संगीत तुमच्या कानापर्यंतच पोहोचत नाही, तर तुमच्या हृदयाचा ठाव घेते, असे प्रतिपादन ज्येष्ठ भारतीय संगीतकार पद्मविभूषण डॉ.इलायाराजा यांनी केले.

अकराव्या अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन एमजीएम संस्थेतील रुक्मिणी सभागृहात बुधवारी (दि.२८) सायंकाळी साध्या पद्धतीने करण्यात आले. यावेळी भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल पद्मपाणी पुरस्काराने पद्मविभूषण इलायाराजा यांना सन्मानित केले. यावेळी संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, एमजीएमचे कुलपती अंकुशराव कदम, ऑस्कर विजेते ध्वनी संयोजक रसूल पुक्कुट्टी, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, महोत्सव संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक



चंद्रकांत कुलकर्णी, संयोजक नीलेश राऊत, सचिन मुळे, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांची उपस्थिती होती.

यावेळी इलायाराजा म्हणाले, संगीताच्या विद्यार्थ्यांनी यंत्रावर वाद्य वाजविण्यापेक्षा प्रत्यक्ष वाद्य शिकली पाहिजेत. वाद्य शिकले नाही, तर ऐतिहासिक परंपरा असलेल्या भारतीय वाद्याला पुढे घेऊन कोण जाणार? असा सवाल उपस्थित केला. माझ्या संगीतामध्ये सर्व काही लाइव्ह वाद्य, वादक असतात. त्या ठिकाणी आम्ही काढलेल्या नोट्सच्या आधारे वाद्य साथ देतात. आमच्या आर्केस्ट्रामध्ये ८८ वादक आहेत. जेव्हा संगीत दिले जाते, तेव्हा त्यात वादक वाद्यांच्या आधारे त्यात जीव ओतत असतात. त्यातून संगीतात जिवंतपणा येतो. तो जिवंतपणा इलेक्ट्रिक वाद्यात नसतो, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप अंकुशराव कदम यांना केला. रसूल पुक्कुट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रस्ताविक सुनील सुकथनकर यांनी केले. कार्यक्रमात अभिनेत्री भाग्यश्री बोरसे हिचा दाक्षिणात्य चित्रपटातील कारकिर्दीसाठी विशेष सन्मान करण्यात आला.

**१,५४५ चित्रपटांना संगीत तरीही शिक्षण सुरूच**

आज विमानात बसण्यापूर्वी १,५४५व्या चित्रपटाला संगीत देऊन आलो आहे. एवढ्या चित्रपटांना संगीत दिले असले, तरी आणखी शिक्षण सुरूच असल्याचे इलायाराजा यांनी सांगितले.

यावेळी सभागृहातील एका तमिळी रसिकाने त्यांना गीत सादर करण्याचे साकडे घातले. तेव्हा त्यांनी संस्कृत पद म्हटले.

# गुरुवंदना : गुरु–शिष्य परंपरेचा सुरेल उत्सव

ज्योतिर्मय साहित्य

संगीत ही केवळ कला नसून ती गुरुपरंपरेने पुढे चालणारी साधना आहे. त्या साधनेचा सन्मान करणारा, गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आणि शास्त्रीय संगीताच्या शुद्ध परंपरेला उजाळा देणारा 'गुरुवंदना' संगीत महोत्सव म्हणजे नाशिकच्या सांस्कृतिक जीवनातील एक प्रतिष्ठेचा सोहळा.

पं. शंकरराव वैरागकर संगीत प्रतिष्ठान यांच्या वतीने गेल्या पंचवीस वर्षांहून अधिक काळ सातत्याने आयोजित होत असलेला हा उपक्रम आज एक समृद्ध सांगीतिक परंपरा बनला आहे.

ज्येष्ठ आणि युवा कलाकारांना एकाच मंचावर आणत, गुरू–शिष्य परंपरेचा अनुभव देणारी ही संकल्पना वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. पद्मभूषण, पद्मश्री पुरस्कारप्राप्त जागतिक दर्जाच्या कलाकारांसोबतच नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य वैरागकर प्रतिष्ठानने सातत्याने केले आहे. वर्षभर चालणाऱ्या मासिक संगीत सभांमधून आजवर साठहून अधिक मैफिली सादर झाल्या असून, त्यातून महाराष्ट्रातील अनेक गुणवान युवा कलाकार घडले आहेत.



शास्त्रीय संगीताचा प्रचार, रसिकांची अभिरुची वृद्धिंगत करणे आणि गुरुपरंपरेचा सन्मान जपणेया त्रिसूत्रीवर या प्रतिष्ठानचे कार्य आधारलेले आहे. या कार्यामागे पं. शंकरराव वैरागकर यांची तपस्वी संगीतसाधना आणि अथक योगदान केंद्रस्थानी आहे. वयाची सत्तरी पार करूनही अखंड संगीतसेवा करणारे नाशिकभुषण पं. वैरागकर ज्येष्ठ शास्त्रीय गायक, कुशल हार्मोनियम वादक आणि आदरणीय संगीत गुरू म्हणून परिचित आहेत. धारवाड येथील पुट्टराज गवईंच्या आश्रमात तसेच पुण्यात पद्मकर कुलकर्णी यांच्याकडे घेतलेल्या तालीमीतून घडलेली त्यांची गायकी रागदारीसोबतच अभंग, भजन व गौळणींच्या भावविश्वाने समृद्ध आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कलाकारांनी शास्त्रीय, नाट्यसंगीत व सुगम संगीत क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

या परंपरेचा उत्सव असलेला 'गुरुवंदना २०२६' येत्या सोमवारी, दि.२ फेब्रुवारी रोजी गंगापूर रोडवरील कुर्तकोटी शंकराचार्य न्यास सभागृहात, सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या वर्षीच्या गुरुवंदनेचे विशेष आकर्षण म्हणजे जागतिक कीर्तीचे बासरीवादक पद्मश्री पंडित रोणू मुजुमदार. मैहर घराण्याचे प्रतिनिधित्व करणारे पं. रोणू मुजुमदार हे हिंदुस्तानी बासरीवादनाला जागतिक व्यासपीठावर नेणारे अग्रगण्य कलाकार आहेत. वाराणसी येथे जन्मलेल्या रोणू मुजुमदार यांनी आपल्या वडील डॉ. भानू मुजुमदार यांच्याकडून प्राथमिक दीक्षा घेतली. पुढे पं. लक्ष्मणप्रसाद जयपूरवाले, पं. विजय राघव राव तसेच पं. रविशंकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची कला अधिक परिपक्व झाली.

१९९६ मध्ये 'टॅब्युला रासा' या अल्बमसाठी त्यांना ग्रॅमी नामांकन मिळाले. २०१४ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार, १९९६ मध्ये आदित्य विक्रम बिर्ला पुरस्कार आणि २०२५ मध्ये पद्मश्री पुरस्काराने त्यांचा गौरव झाला आहे. हजारो बासरीवादकांसह साकारलेला 'वेणू नाद' हा गिनीज विक्रम, चित्रपट साठी केलेले संगीत दिग्दर्शन तसेच आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबतचे सहकार्यत्यांचा संगीतप्रवास थक्क करणारा आहे.

कार्यक्रमाची रचना अत्यंत भावपूर्ण आणि अर्थपूर्ण ठेवण्यात आली आहे.

कार्यक्रमातील प्रथम पुष्प पं. रोणू मुजुमदार यांच्या सोलो बासरीवादनाने गुंफले जाईल.

यानंतर द्वितीय पुष्प म्हणून पं. शंकरराव वैरागकर यांचे शास्त्रीय गायन सादर होणार आहे.




या मैफिलीत साथसंगत लाभणार आहे

श्री. अजिंक्य जोशी (तबला),

श्री. कल्पेश चावला (बासरी),

श्री. आनंद अत्रे (संवादिनी),

आणि पं. व्यंकटेश ढवण (पखवाज).

कार्यक्रमाची सांगता नाशिकभूषण, ज्येष्ठ गायक पं. शंकरराव वैरागकर यांच्या गायनाने होणार असून, हा क्षण रसिकांसाठी निश्चितच अविस्मरणीय ठरेल.

गुरु–शिष्य परंपरेचा सन्मान, शुद्ध शास्त्रीय संगीताची अनुभूती आणि सुरांची आराधनाया त्रिसूत्रीचा अनुभव देणारा गुरुवंदना हा नाशिकच्या सांस्कृतिक परंपरेचा मानबिंदू आहे.


पं. शंकरराव वैरागकर संगीत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. ओंकार वैरागकर यांनी समस्त नाशिककर रसिकांना या सुरेल पर्वात उपस्थित राहून संगीताचा आनंद लुटण्याचे आवाहन केले आहे.

***

A UNIQUE FRAME...




@sanjaydaramwar +91 98694 20337




# जात्यावरच्या ओव्या......

आडरानात घडली
भेट साधुसंतांची
मनी वाटे गजबज
जशी बाजारहाटाची||४७२||

भेटली जत्रेला
भांडकुदळ विहीन
हिला बोलू वाटेना
लई लागे भणभण ||४७३|

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758


# इंद्रायणी काठी....




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

अशा या सर्व संतांच्या शिकवणुकीत साम्य आहे. असे म्हणतात की परमेश्वराला सर्वत्र जाता येत नाही, म्हणून त्याने आई निर्मिली.तसेच मी म्हणेन की परमेश्वराला सर्वाना समजावणे शक्य नव्हते, म्हणून त्याने संतांची निर्मिती केली. सर्व संतांचे हृदय हे आईचेच हृदय. मातेच्या ममतेने संतांनी समाजाचे पालन पोषण केले. माता प्रसंगी बालकाला रागावतेही पण ते त्याच्या हितासाठी. तसे तुकोबा कधी कधी कठोर झाले. पण ते समाजातील अंधश्रद्धा, रूढी, दुष्ट चालीरीती यावर प्रहार करताना. आणि त्या काळात अशा प्रकारे लोकांना समजावून सांगण्याची आवश्यकता होती. लोक आपले कर्तव्य विसरले होते, गुलामगिरीची वृत्ती अंगी भिनली होती, ढोंगीपणा, बुवाबाजी यासारख्या गोष्टीना ऊत आला होता. लोक देवाची खरी भक्ती विसरले होते आणि नवस सायास करू लागले होते. अशा वेळी नवसे पुत्र होती, तरी का करणे लागे पती यासारखे परखड बोल तुकोबांनीच समाजाला ऐकवले.





दांभिकतेवर प्रहर करताना ते म्हणतात-

कथा करोनिया दावी प्रेमकळा,
अंतरी जिव्हाळा कुकर्माचा
तुळसी खोवी कानी दर्भ खोवी शेंडी,
लतिका धरी बोंडी नासिकाची
टिळे टोपी माळा देवाचे गबाळे,
वागवी ओंगळे पोटासाठी
गोसाव्याच्या रूपे हेरी परनारी,
तयाचे अंतरी कामलोभ
कीर्तनाचे वेळी रडे, पडे, लोळे,
प्रेमेविण डोळे गळताती
तुका म्हणे ऐसे भाषेचे महंत,
त्यापाशी गोविंद नाही नाही.

तुकोबांची दुसरी पत्नी आवली. कजाग आणि कर्कश मावली. आणि तुकोबा विठ्ठल भक्त. एवढेच आम्ही जाणतो फक्त. पण खरे म्हणजे असे नव्हते. आवली असेल कजाग आणि कर्कश पण तुकोबांवर तिचे अतिशय प्रेम. म्हणतात ना ज्या व्यक्तीवर आपले प्रेम असते त्या व्यक्तीवरच आपण रागावतो. ते जेवल्याशिवाय ती तोंडात अन्नाचा कणही घेत नसे. आणि तुकोबांची योग्यता ती जाणून होती.

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बध्दमुक्तनिरूपण


ज्योतिर्मय साहित्य

या सगळ्यांना विचारात घेऊन समर्थानी ''बध्दमुक्तनिरूपण''हा समास लिहिला आहे.

माणूस कितीही मोठा असला तरी त्याला व्यावहारिक जगात वावरावे लागते. मी खुपच देवधर्म केला तर मला आता जेवण करण्याची गरज नाही. असं कोणी म्हणणार नाही व्यावहारिक जगात वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अर्थार्जनासाठी करावेच लागते. म्हणजेच प्रपंच व परमार्थ किंवा बध्द। व मुक्त यांचा देहाच्या परिस्थितीशी संबंध नाही हे लक्षात ठेवावे. बध्दपणा व मुक्त पणा या जीवाच्या अवस्था आहेत. त्या प्रत्येकाने अंतर्यामी अनुभवायच्या असतात. अगदी मोठा सत्पुरुष जरी असला तरी त्याला देहाने जगात वावरावे लागते. ज्या जगात बध्द बध्द पणाने जगतो त्याच जगात मुक्त मुक्तपणास बाधा न येता रहातो. जगांत वावरण्याने मुक्त अवस्था भ्रष्ट होत नाही. तर जगात रमण्याने ती भ्रष्ट होते. वावरणे व रमणे यातील फरक या ठिकाणी लक्षात घ्यायला हवा. बध्दाला देहबुद्धीच्या बळाने स्वस्वरूपाचा स्पर्श नसतो तर मुक्ताला आत्मबुध्दी च्या बळाने द्रुष्य विश्वाचा स्पर्श नसतो. द्रुष्यविष्व हेच संपूर्ण सत्य मानून बध्दाचे मन मीपणाने वावरते. तर आत्मस्वरूप ब्रम्ह हेच संपूर्ण सत्य मानून मुक्ताचे मन उन्मन होऊन वावरते. शुध्दब्रम्ह निरूपण अभ्यासताना आपण पाहिले आहे की ब्रम्हाच्या ठिकाणी देहबुद्धी व आत्मबुध्दी दोन्हीही नाहीत. ते स्वतः सिध्द असल्याने त्याला बध्दपणा नाही व मुक्त पणाही नाही. पण आपणं त्याच्या विविध प्रकारच्या लक्षणावरून अभ्यासू शकतो की हा विचार फक्त मानवी देहालाच लावला जातो.

(क्रमशः)

# संत कसे असतात?



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आपले शहाणपण बाजूला ठेवून जो संताला शरण जातो तोच खरा साधक. ज्याला सर्व सृष्टी रामरूप दिसते, आणि शिष्यालाही जो रामरूप पाहतो, तोच खरा गुरू. सद्गुरू कधीही मिंधेपणाने वागत नाही, आणि त्याला भीतीचा लवलेशही नसतो. आपला शिष्य कोणत्या आध्यात्मिक भूमिकेवर आहे हे संतांना कळते. देहबुद्धीचे लोक विषयाचे दास असतात, पण संत मात्र विषयावर मालकी गाजवतात. संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, किंवा त्याची आवड उत्पन्न झाली म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे. औषध काय आहे हे न कळतासुद्धा रोग्याने ते श्रद्धेने घेतले तर त्याला गुण येतो, किंवा एखाद्याला स्वयंपाक करता आला नाही तरी त्याला अन्नाची चव समजते आणि तो पोटभर जेवू शकतो. त्याचप्रमाणे एखाद्याला ज्ञानाचा अनुभव येईल, पण शब्दाने त्याला तो सांगता येईलच असे नाही.

मीठ खारट आहे याचे जसे आपल्याला दु:ख होत नाही, त्याचप्रमाणे जगामधल्या लढाया, हाणामाऱ्या, सज्जनांचा छळ, संकटे, यांचे संतांना वाईट वाटत नाही. 'वाईट वाटत नाही' याचा अर्थ ते त्यांना आवडते असा मात्र मुळीच नव्हे. पण मीठ जसे खारटच असणार, तशा जगात या घडामोडी होणारच, जगाची रहाटीच अशी आहे, हे समजून तो दु:ख करणार नाही. किंबहुना, मीठ फार झाले तर खारटपणा जसा सहन होत नाही, तसे त्यालाही होईल. इतकेच नव्हे, तर त्याचा प्रयत्नही जगातले वाईट कमी करण्याकडेच असतो.

विहिरीतल्या बेडकांना जशी समुद्राची कल्पना येत नाही तशी आपल्याला संतांची कल्पना येत नाही. संत हे पहिल्याने आपल्यासारखेच होते, परंतु अनुसंधानाच्या मार्गाने ते वर गेले. आपल्याला संत 'शोधण्याची' मुळीच जरुरी नाही. आपली इच्छा बलवत्तर असेल तर संतच आपला शोध करीत आपल्याकडे चालत येतील. आपली भावना कशी आहे इकडे संतांचे लक्ष असते. संत हा गुप्तपोलिसासारखा आहे; तो आपल्यामध्ये आपल्यासारखा राहतो, पण आपल्याला ओळखता येत नाही. संताला स्वत:च्या शरीरात काय चालले आहे ते सर्व दिसते; म्हणून तो रोगाची काळजी करीत नाही. संताला कर्म मागेपुढे करता येते, पण ते टाळता येत नाही; ते कुणाला तरी भोगलेच पाहिजे. संत जे साधन सांगतात ते आपल्या शक्तीप्रमाणेच असते. संत जो बोध सांगतात, त्याचे आपण थोडेतरी पालन करू या.

संत हा जसे बोलतो तसे वागतो. आपण बोलतो चांगले आणि वागतो मात्र त्याच्या उलट.



# श्री संत ज्ञानेश्वर अभंग व अर्थ

अभंग २९

वेद प्रमाण करावया गोकुळासि आला । कीं नाटळिचा कुवांसा जाला । ब्रह्म आणि गोवळा । ब्रह्मादिका वंद्यु ऐसा निगमु । पैं लाजविला ॥ गणिका स्वीकारि राहो मांडला । कीं दशरथ पतनीं चुकविला । एका तें म्हणे जागा । एका तें म्हणेरे निजा । तैं मुचुकुंदापें काळयवनु आणिला रया ॥१॥ विरोचनसुत । बळी बांधोनि जेणें । निगड निबध्द गजा सोडविलें । एकाचीं बालकें काळापासूनियां हिरे । एका बाळाचे बाप विदारिले । शिशुपाळा जैत देऊनियां शेखिं पाहेपां आपणचि जिंकीलें रया ॥ ध्रु०॥ गुरुदुर्वास याचिये भक्ति आणि त्याचियेची रथीं देविरुक्मिणीसहित खांदु चालविला । तो तेणें मानें फुंदो पाहे तंव कोलतिया भेणें त्रैलोक्य हिंडविला । पैजा सारुनि हातीं सुदर्शन वसविलें कीं भीष्मपण । साचू केला । जितुकाचि कौरवा तितुकाचि पांडवां अचोज हा अमुलारया ॥२॥

पुढील उद्याच्या भागात......



# आरोग्य संजीवनी

## किडनी संदर्भात क्रियेटीनीन लेव्हल योग्य स्थितीत ठेवण्यासाठी खालील उपाययोजना करावी.....

ज्योतिर्मय साहित्य

किडनी संदर्भात क्रियेटीनीन लेव्हल योग्य स्थितीत ठेवण्यासाठी खालील उपाययोजना करावी.....

किडनी संबधीत आजारात हे प्रमाण वाढले की किडनी फेल्युअरचा धोका तयार होतो यासाठी उपाययोजना...

१) मक्याच्या केसांना रोज उकळून ते पाणी कपभर प्या. २) कोथिंबीर रस घ्या. ३) कोबीचा रस घ्या.

४) दालचिनी पावडरचा काढा एक चमचा मध घालून घेणे. ५) प्लंबम ३० या होमिओपॅथी च्या चार चार गोळ्या रोज सकाळी घेणे. ६) पाणी भरपूर पिणे (३ ते ४ लिटर). ७) हलका व्यायाम करणे. ८) मासाहार टाळावा. ९) केमोमाईनच्या पानांचा काढा घेणे. १०) नेटल लीफ टी घेणे.

११) मुळ्याच्या पानांचा रस एक चमचा घ्या. (रोज)

१२) रोज उशीरासव घेणे तीन वेळा दोन चमचे समभाग पाण्यात. १३) चंद्रप्रभा वटी व मुत्रदोष नाशक वटी घेणे. १४) ब्राम्ही च्या पानांचा रस व काळीमिरी एकत्र घेणे. १५) जेवणातील प्रोटीन मात्रा बंद करून प्रोटीन फ्री डायट देणे. १६) उच्च रक्तदाब कंट्रोल मध्ये आणणे. १७) नशा, चहा, काँफी बंद करणे. १८) पुनर्नवासव घेणे.

( ९ व १० मध्ये नमूद केलेली केमोमाईन व नेटल लिफ ही झाडे नर्सरीतून मिळतील)

किडनीचे आजार...

किडनी फेल्युअर विकारांवर अथवा किडनी अंशतः काम करते किंवा डायलेसिस सुरू असलेली मंडळी ही हे उपाय करु शकतात.

ही संपुर्ण पणे आयुर्वेदिक पध्दती असून याचे साईड इफेक्ट्स नाहीत...

१) चार लिटर पाणी उकळून पाव म्हणजे एक लिटर झाल्यावर ते पाजणे थंड करून आर ओ चे पाजू नका. एक लिटर पाणी दिवसभरात

२) क्रियेटीनीन वाढलेल, ब्लड युरीया वाढलेला आहे, डायलेसिस चालू आहे, पोटॅंशियम ची मात्रा अधिक झालेली आहे, ज्यांची किडनी हे पदार्थ मुत्रमार्गातून रिमुव्ह न करत असल्याने अंगावर एक प्रकारची सूज येते अशा सर्वांना गीलोय, गोखरू, पुनर्नवा पंचांग यांना घरी आणून चांगले कुटून दहा ग्रॅमच्या प्रमाणात एकत्रितपणे एक कप पाण्यात उकळून पाव कप झाल्यावर ते देणे. नर्सरीमध्ये ही झाडे सुध्दा मिळतात ती घरी लावून ही रस काढता येतो किंवा अनेक आयुर्वेदिक दुकानात हा रस मिळतो. ते न मिळाल्यास तिघांचे काढे बाजारात मिळतात. ते दोन दोन चमचे या प्रमाणात द्या पंधरा दिवसात रिपोर्ट मध्ये फरक दिसेल. दिवसात दोनदा देणे.

३) क्रियेटीनीन वाढलेल्याना मसालेदार पदार्थ, हेवी जेवण देऊ नका. जी गोष्ट वाढलेय ते कंटेन्ट असलेले पदार्थ देऊ नका. उदा. सोडियम, पोटॅशीयम, युरिया वाढलेल्या मंडळींनी हे कंटेन्ट असलेले पदार्थ देऊ नका.


४) कपालभारती, अनुलोम, विलोम भसरीका दहा मिनिटे करायला सांगा.

५) हातावरील, पायावरील किडनीचे अँक्युप्रेशर पाँइंट दाबत जा.

तीन पेक्षा कमी क्रियेटीनीन असलेले मेंबर्स, तीन ते पाचमधील पेशंट ज्यांची किडनी सत्तर टक्के काम करते.अशा पेशंट यांना याचा लवकर रिझल्ट येतो. पण ही औषधे घेताना ही तुमच्या डॉक्टर ना अथवा स्थानिक वैद्याचा सल्ला घ्या. पण अनेक लोकांची डायलेसीस याने बंद होऊ शकतील हा विश्वास आहे.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



# लघु बोधकथा

◆दृष्टीकोन बदला◆

एक झाड सुंदर फळाफुलांनी बहरून गेले होते. सुंदरता आणि संपन्नतेमुळे पक्षी अधिक प्रमाणात त्या झाडावर राहत होते. झाडही आनंदाने आश्रय आणि भोजन देत होते. तसेच वाटसरूंना सावली देण्याचे कार्यही झाड प्रामाणिकपणे करत होते त्यामुळे वाटसरूंचे आशीर्वाद झाडाला मिळत असत. त्यामुळे झाडाजवळ सदैव प्रसन्नता असायची मात्र कालांतराने झाडाला या गोष्टीचा गर्व झाला आणि माझ्यासारखे दुसरे झाडच नाही, सगळ्या झाडात मीच श्रेष्ठ आहे असा भ्रम त्याला झाला. काही काळाने झाडाला फळे फुले येण्याचे बंद झाले, पानांची गळती सुरु झाली. सावली नसल्याने वाटसरू येईनात, फळे नसल्याने पक्षी राहिनात अशी अवस्था झाली. झाडाला वाईट वाटले त्याने तेथून जाणा-या एका सिद्धपुरुषाला विचारले की माझ्या आयुष्यभर मी सर्वांची सेवा केली पण माझ्या या वृद्धापकाळी माझी कोणी साधी विचारपूस सुद्धा का करीत नाहीत. काही लोक तर मला तोडण्याची भाषा करत आहेत. सिद्धपुरुष म्हणाले, अरे वृक्षराजा, तू विचार करण्याची पद्धत बदल, जीवनभर लोकांच्या कल्याणसाठी राबणारा हा तुझा डोलारा आता तुझ्या मृत्युनंतरही उपयोगी पडणार आहे. तुझ्या लाकडाचे अनेक उपयोग माणसाच्या कल्याणासाठी होणार आहेत. मरूनही तू चिरंतन माणसाच्या स्मरणात राहणार आहेस. तेव्हा तू तुझ्या मरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदल. हे ऐकून वृक्षाला आनंद वाटला व त्याने दु:ख न मानण्याचे ठरवले.

तात्पर्य : कोणत्याही गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास त्यातील चांगल्या बाबी लक्षात येतात. मात्र नकारात्मक विचारसरणीने नुकसान होण्याचीही शक्यता असते.

# श्रीयश प्रतिष्ठानद्वारे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा

## इंजिनीअरिंग, पॉलिटेक्निक, फार्मसी, एमबीए, आयुर्वेद आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण





**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : श्रीयश प्रतिष्ठानच्या टेक्निकल कॅम्पसमध्ये प्रजासत्ताक दिनाचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी एक्स्पर्ट ग्लोबल सोल्युशनचे सहसंस्थापक व संचालक श्री. मुकुंद कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्रीयश प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. इंजी. बसवराज मंगरुळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार केला.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण व ध्वजवंदन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर एनसीसीच्या मुला-मुलींच्या दोन तुकड्यांनी भव्य परेड सादर करून पाहुण्यांना मानवंदना दिली.

यावेळी बोलताना श्री मुकुंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. भारत लवकरच तिसरी आर्थिक महासत्ता होऊन एक विकसित राष्ट्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मात्र हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शिस्त, तिचे महत्त्व आणि आजच्या तरुण पिढीच्या सक्रिय योगदानाची नितांत आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कठोर परिश्रम, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोनातून जीवनात यश संपादन करून देशाच्या विकासात योगदान द्यावे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना मा. इंजी. बसवराज मंगरुळे यांनी १९८३ साली मेलबर्न ते सिडनी या ८७५ किमी अंतराच्या मॅराथॉन स्पर्धेत ६१ वर्षीय शेतकरी स्पर्धकाने मिळवलेल्या यशाचा दाखला देत, जिद्द, निष्ठा, योग्य नियोजन आणि मनापासून केलेल्या प्रयत्नांमुळे यश निश्चित मिळते, असा बोध विद्यार्थ्यांना करून दिला.

कार्यक्रमात अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, एमबीए, आयुर्वेद व नर्सिंग महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम, समूह नृत्य, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण तसेच देशातील वर्तमान परिस्थितीवर आधारित भारताची प्रतिज्ञा ही लघुनाटिका सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

दरम्यान, सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलतर्फे आयोजित औरंगाबाद ऑटो अँसिलरी कंपनीच्या कॅम्पस मुलाखतींमध्ये श्रीयश अभियांत्रिकीच्या ६७ विद्यार्थ्यांची निवड झाली. याप्रसंगी मा. इंजी. बसवराज मंगरुळे यांच्या हस्ते निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, एमबीए, आयुर्वेद व नर्सिंग महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दोस्ती फाउंडेशनच्या लोककला स्मृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार सौ.माया नितीन नवथर यांना जाहीर



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : दोस्ती फाउंडेशन तर्फे विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात येत आहे.

सौ.माया नवथर यांना दोस्ती फाउंडेशनचा लोक कलावंत पै. मजनूभाई शेख स्मृती गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे फाउंडेशनचे अध्यक्ष माननीय रज्जाक शेख सुप्रसिद्ध गझलकार व सचिव आनंदा साळवे यांनी पत्राद्वारे कळविली आहे.

सौ. माया नवथर या अनाथ आश्रमातील मुले तसेच निरीक्षण गृहातील मुले महिला सुधार गृहातील मुली या सर्वांना त्या विनामूल्य समुपदेशनाचे कार्य करतात. तसेच अनेक शाळा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षणाचे धडे ही त्या विनामूल्य देतात. आपल्या जीवनात भौतिक शिक्षणाबरोबरच नैतिक शिक्षण किती महत्त्वाचे आहे याचे अनेक उदाहरण देऊन आपल्या प्रभावी शैलीत मुलांच्या हृदयापर्यंत जाऊन त्या पोहचतात ह्या त्याच्या कार्यामुळे अनेक मुलांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून येत आहे त्यांच्या या कार्यामुळे त्यांना हा सन्मान प्राप्त झालेला आहे.

सदर समारंभ ३१ जानेवारी २०२६ रोजी शासकीय विश्रामगृह श्रीरामपूर येथे होत असून कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. प्रा.महावीरसिंग चव्हाण ज्येष्ठ साहित्यिक तथा प्रा महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी प्रमुख अतिथी राणीताई सोनवणे उपविभागीय प्रादेशिक अधिकारी आरटीओ श्रीरामपूर यांच्या शुभहस्ते पुरस्कार विवरण संदीप बोरकर प्रदेशाध्यक्ष दिव्यंग लोक कलावंत न्यायहक्क संघर्ष समिती हे उद्घाटक आहेत. सुभाष सोनवणे ज्येष्ठ साहित्यिक पोलीस अधिकारी डॉ सलीम शेख बैतूशिपा फाउंडेशन यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम होत आहे. सौ. माया नवथर यांना या पुरस्कार बद्दल अनेक सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे

## मनपा शाळा एन-७ सिडको शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा!



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय एन सेवन सिडको छत्रपती संभाजीनगर शाळेत भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मा. मुख्याध्यापक श्री शेख अहमद पटेल सर यांच्या मार्गदर्शनानुसार सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. क्रीडा महोत्सवाचे अध्यक्षपद छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त तथा शिक्षणविभाग प्रमुख माननीय श्री अंकुश पांढरे सर यांनी भूषवले. प्रभागाचे नगरसेवक मा.श्री.गणेश भाऊ नावंदर, मा. श्रीमती सुरेखाताई सानप, मा. श्री शिवाजीभाऊ दांडगे, मा. श्रीमती अर्चनाताई चौधरी, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष श्रीमती ज्योतीताई खंडाळे, उपाध्यक्ष एडवोकेट नरहरी कांबळे सर उपस्थित होते. शाळेतील ध्वज संचालन श्री मनोज अग्रवाल, श्री दीपक पडोळ, पल्लवी भांडारकर व श्री रमेश देवडे यांनी केले. शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर कवायत सादरीकरण केले. तसेच देशभक्तीपर गीतावर लेझीम सादरीकरण केले. देशभक्तीपर गीत गायन, नृत्य, देशभक्तीपर भाषण विद्यार्थ्यांनी सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी म्हस्के व अश्विनी साठे या विद्यार्थिनींनी केले.क्रीडा शिक्षक श्री. सागर मगरे, श्री. मनोज अग्रवाल, श्री. दीपक पडोळ, श्री. प्रितीश सराटे, श्रीमती वैशाली देशमुख, श्री ज्ञानेश्वर असोलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेतील इतर शिक्षक व शिक्षिका यांनी कार्यक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी सक्रियपणे सहभाग घेतला.

कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मा. श्रीमती सुनंदा आरदवाड, मा श्रीमती अनिता शेटे, मा. सौ संगीता आंबेकर,मा. श्रीमती मंगला महाजन, मा. श्रीमती सुनिता पाटील, मा. श्रीमती वैशाली सुरडकर,मा. श्रीमती अंजली कुलकर्णी,मा. श्रीमती स्वाती घोडतुरे, मा. श्री मनोज अग्रवाल, मा. श्रीमती शिल्पा बहुरे, मा. श्रीमती वैशाली देशमुख, मा. श्रीमती मंजुश्री राठोड, मा. श्री. वेंकट जाधव, मा. श्रीमती शुभांगी चव्हाण, मा. श्री दीपक पडोळ, मा. श्री संदीप कळंबे, मा. श्रीमती फिरदोस नदाफ, मा. श्रीमती सबासदफ सिद्दिकी, मा. श्रीमती पल्लवी क्षीरसागर, मा. श्री. पल्लवी भांडारकर, मा. श्री. ज्ञानेश्वर आसोलकर, मा. श्री. प्रितीश सराटे, मा. श्री. सागर मगरे, मा. श्री. सुशील दांडगे, मा. श्रीमती अश्विनी घोडके, मा. श्रीमती अंकिता बोचरे या शिक्षक शिक्षिकांनी आणि मा. श्री.रमेश देवडे, मा. श्री. विजय गायकवाड या सेवकांनी सक्रियपणे सहभाग घेतला.

# स्वा.स्वातंत्र्यवीर सावरकर जेष्ठ नागरिक संघातर्फे मधुकर निलेगावकर यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

धायरी पुणे : जेष्ठ साहित्यिक श्री.मधुकर निलेगावकर यांनी सन १९७८ पासून काव्यलेखनाचा, गीतलेखनाचा तसेच, सामाजिक लेख लेखनाचा छंद जोपासला आहे सन १९८१ ते १९८३ या कालावधीत पुणे येथील दै. सांजसमाचार या दैनिकात अनेक सदरांचे लेखन केले. ''माणुसकीचा गहिवर'' याला जीवन ऐसे नाव'' नावाचे साप्ताहिकात सदराचे लेखन केले. तसेच आत्तापर्यंत अनेक कविताही प्रसिद्ध झाल्या. सन १९८४ ते १९८८ या कालावधीमध्ये लातूर येथे दै. यशवंतमध्ये ''संसारयात्रा ''नावाचे साप्ताहीक सदर चालविले. तसेच, अनेक कविता सामाजिक लेख प्रसिद्ध झाले. पुण्यात आल्यावर सन २०१३ पासून पुण्याच्या सेवाप्रबोधनी संस्थेचे नामांकित पाक्षिक ''चिंतन आदेश'' मध्ये लेख व अनेक कविता प्रसिद्ध झाल्या .तसेच, दैनिक आधुनिक केसरी, दै.गावकरी, दै.ग्लोबलभारत, दैनिक जनसंजीवनी, दै.न्यूजटाईम्स टूडे इत्यादींमध्ये अनेक कविता व लेख आजतागायत प्रसिद्ध झाले आहेत. दै.चिंतन आदेशच्या निबंध स्पर्धेत स्पर्धेत तीन वर्षे बक्षिसे मिळाली आहेत.

थेरगाव, चिंचवड, पुणे इथे गणेश चतुर्थी उत्सवात ''पर्यावरणाच्या श्वासावर बोलू काह'' या विषयावर एकपात्री व्याख्यानात्मक प्रयोग सादर केला आहे. तसेच, अन्य ठिकाणीही प्रयोग झाले आहेत. पुणे व बारामती येथे अनेक काव्यस्पर्धेत बक्षिसे मिळालआहेत. याशिवाय, पुण्याच्या जेष्ठ नागरिकांच्या ''जेष्ठ प्रज्योत'' या मासिकात लेख प्रकाशित आहेत. तसेच, सन २०२५ पासून दैनिक ज्योतिर्मयमधूनही अनेक लेख व कविता त्यांच्या प्रकाशित होत असतात. नाशिकचे दैनिक गावकरीमधूनही अनेक सामाजिक प्रबोधनात्मक लेख व कविता प्रकाशित होत असतात. विशेष म्हणजे अध्यक्ष, मा.श्री. वि.ग. सातपुते (आप्पा) यांच्या उत्कृष्ट सहकार्यामुळे महाकवी कालिदास प्रतिष्ठानच्या अनेक काव्यसंमेलनात त्यांना काव्यवाचन, काव्यगायन करण्याची संधी मिळाली आहे. तसेच, सन्मानपत्र व बक्षिसेही मिळाली आहेत.

विशेष लेखन: पर्यावरणविषयक शंभराच्या वर चारोळी प्रकारातील तसेच, वाहतूक व्यवस्था, वाहतूकीवर आधारित चारोळी प्रकारातील काव्यलेखन केले आहे. अनेक दैनिकातून सामाजिक प्रबोधनात्मक लेखांद्वारे व कवितांद्वारे सामाजिक प्रबोधनाचे लेखनकार्य चालू आहे . पुण्यातील थेरगाव,चिंचवड येथे श्रीगणेशचतुर्थी उत्सवात ''पर्यावरणाच्या श्वासावर बोलू काही '' या विषयावर व्याख्यानात्मक कार्यक्रम सादर



केला. त्याबाबत त्यांचे अनेक कार्यक्रमही झाले आहेत. पुण्यातील धायरी, पुणे येथील स्वा. स्वातंत्र्यवीर सावरकर जेष्ठ नागरिक संघातर्फे जानेवारी,२०२६ मधील वाढदिवसानिमित्त श्री.मधुकर एकनाथराव निलेगावकर यांचा स्वा. सावरकर जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष. मा. श्री.दत्तात्रेय देशपांडे यांच्या हस्ते शुभेच्छापत्र, गुलाबपुष्प आणि भेटवस्तू देवून विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विशेष मान्यवर अतिथी नगरसेवक श्री.काकासाहेब चव्हाण, डॉ.देशपांडे व स्वा.सावरकर संघाचे सचिव श्री धनंजय देशपांडे उपस्थित होते. प्रसिद्ध गायिका सौ.ऋतूजा अजय जोशी पांडे यांच्या भावगीत, भक्तीगीत गायनानंतर पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.












# आनंदाचे झाड प्रत्येकाच्या आयुष्यात उभं करण्यासाठी समुपदेशन महत्त्वाचं- डॉ. पूनम सोनवणे

**ज्योतिर्मय साहित्य**

नरसापूर : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव भेलके महाविद्यालय नसरापूर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आजीवन अध्ययन विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात समुपदेशन या विषयावर अर्धदिवशीय कृतीसत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रासाठी प्रमुख पाहुणे वक्ते म्हणून आझम कॉलेज, पुणे येथील प्रा. डॉ. पुनम सोनवणे आणि मासूम संस्थेच्या तालुका सहसंयोजक जयश्री नलगे उपस्थित होते. डॉ. पुनम सोनवणे यांनी आपल्या व्याख्यानामध्ये समुपदेशन आणि मार्गदर्शन यातील फरक विशद केला.त्यांनी मानसशास्त्र म्हणजे काय? तसेच मानसशास्त्रद्वारे शैक्षणिक समुपदेशन कसे जाते, याचे विश्लेषण केले. तसेच प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये ताणतणाव असतो आणि या ताणतणावातून मार्ग काढण्यासाठी समुपदेशन महत्त्वाचे असते. परंतु प्रत्येक वेळेसच समुपदेशक तुमच्याकडे उपलब्ध असेल असे नाही. अशावेळी आपण स्वतः मार्ग शोधणे आणि स्वतःचा समुपदेशक होणे ही प्राथमिक जबाबदारी आपली आहे. त्याचबरोबर आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपले व्यक्तिमत्व घडवण्यासाठी आपल्यात छोटे-छोटे बदल केले पाहिजेत. ताण-तणावाचा शरीरावरही आपला परिणाम होतो.काही व्यक्ती ह्या जास्त भावनिक असतात. त्यांचा रागावर आणि रडण्यावरही नियंत्रण राहत नाही. अशा वेळेस या



भावनिक बंधांचे व्यवस्थापन करणे हे समुपदेशकाचे काम ठरते. समुपदेशनामध्ये वेळेचे व्यवस्थापन, कौशल्यविकास, सकारात्मक भूमिका, मनाचे आरोग्य आणि सुसंवाद महत्त्वाचा ठरतो. आपल्या आयुष्यामध्ये ज्या गोष्टींनी आपल्याला आनंद मिळतो त्या गोष्टी आपण केल्या पाहिजेत. प्रत्येक वेळेस छोट्या कृतीतून आपण नवनवीन गोष्टी शिकत असतो. त्याचबरोबर आभार मानणे याच्यातून कृतज्ञता व्यक्त करता येतेत्यामुळे परस्पर सहकार्य वाढीस लागते असेही त्यांनी सांगितले. व्याख्यानाची सुरुवात त्यांनी 'आनंदाचे झाड' या गीताने करून व्याख्यानात रंगत आणली.

या कार्यशाळेसाठी दुसरे व्यक्ती असणारे मा. जयश्री नलगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्याकडून ताण-तणाव आणि त्याचे व्यवस्थापन करत असताना हिंसा आपण टाळली पाहिजे. ताणतणावाचा परिणाम शरीरावरती होतो आणि माणूस हिंसक होतो. यावरती प्रत्येकाने विजय मिळवला पाहिजे. त्याचबरोबर जीवनामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारताना सम्यक दृष्टीने समाजाचा विचार केला पाहिजे. प्रेमाच्या नावाखाली समाजात होणाऱ्या हिंसा ही अत्यंत खेदजनक गोष्ट असल्याचे त्यांनी अनेक उदाहरणातून सांगून दिले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, महात्मा गांधी, शाहू महाराज यांच्या विचारांची गरज आजच्या तरुणाईला आहे, असे देखील त्यांनी विशद केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. रोहिदास ढाकणे यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समुपदेशन ही काळाची गरज आहे यावर भर दिला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या भावनांवर नियंत्रण मिळवायला शिकलं पाहिजे असेही त्यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. संदीप लांडगे यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये विद्यार्थ्यांना अनेकांकडून उपदेश मिळत असतो पण समुपदेशन होणं किती महत्त्वाचं आहे हे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थिनी कुमारी सायली बिऱ्हामणे हिने केले. तर आभार द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थिनी गिरी राधा हिने मानले. या कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर तुषार शितोळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. संदीप लांडगे, प्रा.माऊली कोंडे, प्रा. जीवन गायकवाड, प्रा. वैष्णवी कोंडे, प्रा. अंकिता महांगरे, प्रा. वनिता भालेराव, डॉ.सचिन घाडगे, डॉ. जगदीश शेवते, प्रा. सहदेव रोडे, प्रा भगवान गावित, श्री विकास ताकवले, श्री सोनवणे, श्री महेश दळवी यांनी केले.

## मुद्रा साहित्य सेवा संस्था जालनाच्या वतीने काव्य अभिवाचन

**ज्योतिर्मय साहित्य**

जालना :- मुद्रा साहित्य सेवा संस्था जालनाच्या वतीने शनिवार दिनांक ३१ जानेवारी २०२६ २रोजी सायंकाळी सात वाजता वेणूताई विश्वनाथ भाले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ परभणी येथील सुप्रसिद्ध कवी वा.वि. पाटील यांच्या कवितेवर आधारित काव्य अभिवाचन आयोजित केले आहे.हा कार्यक्रम रंगनाथ नगर इंदेवाडी येथे कवी कैलास भाले यांच्या निवासस्थानी होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध कवी सुहास पोतदार हे राहणार असून ज्येष्ठ साहित्यिका सामाजिक कार्यकर्त्या रसना देहेडकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. वा.वि पाटील यांच्या कवितेचे अभिवाचन वत्सला पाटील व मनीष पाटील हे करणार आहे. वा.वि पाटील हे परभणी येथील सुप्रसिद्ध कवी असून शापित माती हा त्यांचा बहुचर्चित कवितासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे. तसेच अखिल भारतीय साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्यांना अनेक वेळा निमंत्रित करण्यात आले आहे.वा.वि पाटील हे हिंदी मराठी उर्दूतून कविता आणि गझल लेखन करतात.या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहण्यासाठी मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे रमेश देहेडकर, सुनील लोणकर,प्रा. पंढरीनाथ सारके, शिवाजी तेलंगे, सुधाकर वाहुळे यांनी आव्हान केले आहे.

# प्रजासत्ताक परेडमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ अव्वल

## गणेशोत्सवाची संकल्पना देशभरात सर्वोत्कृष्ट

**ज्योतिर्मय साहित्य**

नवी दिल्ली : प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ प्रथम तर द्वितीय क्रमांकावर जम्मू काश्मीर आणि तृतीय क्रमांकावर केरळ राज्याचा चित्ररथ राहिला. केंद्र सरकारच्या वतीने संरक्षण मंत्रालयाने ही घोषणा केली.

महाराष्ट्राच्या चित्ररथाची यंदाची संकल्पना ही गणेशोत्सवाची होती आणि तो चित्ररथ सर्वोत्कृष्ठ ठरला आहे. तुषार प्रधान, रोशन इंगोले , कृष्णा सालवटकर, श्रीपाद भोंगाडे यांनी महाराष्ट्राच्या चित्ररथाला आकार दिला होता. विविध निकषांवर झालेल्या मूल्यांकनानंतर महाराष्ट्राला प्रथम क्रमांक जाहीर करण्यात आला.

आत्मनिर्भर भारत संकल्पनेवर आधारित

आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर महाराष्ट्राच्या चित्ररथावर सजावट करण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्रातील गणेशोत्सवाचे दर्शन घडलं. महाराष्ट्राच्या चित्ररथावर अष्टविनायकांच्या प्रतिकृती, ढोलताशे आणि गणपती बाप्पाची मूर्ती अशी सजावट होती. गणेशोत्सव आज असंख्य




लोकांना आत्मनिर्भर बनवत आहे. यावरूनच गणेशोत्सव-आत्मनिर्भरतेचे प्रतिक ही संकल्पना चित्ररथातून सादर केली गेली.

यंदाच्या महाराष्ट्राच्या चित्ररथाच्या माध्यमातून आर्थिक आत्मनिर्भरता कशी आणली जाते, हे दाखवण्यात आलं. गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील प्रमुख क्षण आहे. गणेशोत्सवाच्या काळात महाराष्ट्रात ६० ते ७० लाख कोटींची उलाढाल होते. आत्मनिर्भर भारत या मोहिमेला गणेशोत्सवाच्या माध्यमातून कशी चालना मिळते, हा संदेश चित्ररथाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

लोकमान्य टिळकांनी लोकांनी एकत्र येण्यासाठी गणेशोत्सवाची सुरूवात केली. गणेशोत्सवचे स्वरुप दिवसेंदिवस मोठे होत चालले आहे. मुंबईसह राज्यातील असंख्य मंडळांकडून गणेशोत्सव साजरा केला जातो. गणेशोत्सवाच्या माध्यमातून आज कोट्यवधींची उलाढाल होत आहे. मूर्तीकार, सजावट करणाऱ्यांना मिळणारा रोजगार तसेच त्यातून तयार होणारी आर्थिक साखळी हा चित्ररथाचा मुख्य विषय होता.

देशभरातून ३० चित्ररथांचा समावेश

या वर्षीच्या परेडमध्ये एकूण ३० चित्ररथांनी भाग घेतला. १७ राज्ये आणि १३ केंद्र सरकारच्या विभागातील चित्ररथाचा यामध्ये समावेश होता. स्वातंत्र्याचा मंत्र वंदे मातरम आणि समृद्धीचा मंत्र आत्मनिर्भर भारत ही यंदाची थीम होती. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात कोणत्या राज्याचा चित्ररथ सहभागी होणार यासाठी एक समिती निर्णय घेते. यामध्ये कलाकार, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, पद्म पुरस्कार विजेते सामील असतात. प्रत्येक वर्षी आलटून पालटून राज्यांच्या चित्ररथांना परेडमध्ये समाविष्ट केले जाते.

# बालगृहातील बालकांनी अनुभवला 'सूर्यकिरण एरोबॅटीक शो'चा थरार; विविध बालगृहातील १८० बालकांची उपस्थिती



**ज्योतिर्मय साहित्य**


नाशिक - जिल्हा प्रशसान व भारतीय हवाई दलाच्या माध्यमातून 'सूर्यकिरण एरोबॅटीक शो' पथकाच्या थरारक प्रात्यक्षिकाचा प्रत्यक्ष अनुभव २३ जानेवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील विविध बालगृहांतील बालकांनी अनुभवला. गंगापूर धरण परिसरात आयोजित या कार्यक्रमात बालकांनी आकाशात सादर होणाऱ्या आकर्षक कसरती, वेगवान विमानांची मांडणी आणि शिस्तबद्ध उड्डाण कौशल्य जवळून पाहिले, अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील दुसाने यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्यात आत्मविश्वास, जिज्ञासा व देशभक्तीची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यातून राबविण्यात आला. हवाई कसरती दरम्यान आकाशात रंगांची उधळण करत सादर करण्यात आलेल्या विविध रचना पाहून बालकांमध्ये विशेष उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमात जिल्ह्यातील सुमारे १८० बालकांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला व बाल विकास विभाग, जिल्हा प्रशासन तसेच बालकल्याण समिती यांचे समन्वयाने नियोजन करण्यात आले होते.

यावेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाचे अधिकारी, बालकल्याण समिती नाशिकचे पदाधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड हेल्पलाईन, तसेच विविध संस्थांमधील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बालकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली होती.

या उपक्रमामुळे बालकांना एक वेगळा आणि प्रेरणादायी अनुभव मिळाला असून त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याची भावना उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559